

EDUCATION THROUGH SELF HELP IS OUR MOTTO



रयत शिक्षण संस्थेचे,

एस.एम.जोशी कॉलेज, हडपसर, पुणे-२८.

नॅक-ए ग्रेड, संलग्न सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

रयत शिक्षण संस्थेचे,

एस. एम. जोशी कॉलेज, हडपसर, पुणे-२८.

मराठी विभाग आयोजित

आंतरराष्ट्रीय वेबिनार

# विषय:मराठीतील १९६०नंतरचे विविध वाङ्मयीन प्रवाह व सद्य:स्थिती

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

Impact Factor 3.102 (IIJIF)

विद्यावार्ता™

प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे

**प्रमुख संपादक**

प्रा.डॉ.राजेंद्र ठाकरे

प्रा.डॉ.अतुल चौरे

**सहाय्यक संपादक**

प्रा.डॉ.नम्रता मेस्त्री

प्रा.डॉ.संदीप वाकडे

शनिवार दि.११ सप्टेंबर २०२१

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

30

# देशीवाद : स्वरुप व संकल्पना

डॉ.बी.पी.गार्डी
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर

************

स्वातंत्र्योत्तर काळात साहित्य क्षेत्रात विविध प्रवाह निर्माण झाले. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, भटके विमुक्त, आदिवासी असे साहित्याचे नवे प्रवाह बहरास आले. या सर्व प्रवाहाच्या साहित्याने केवळ साहित्यक्षेत्रच नव्हे तर महाराष्ट्राचे संपूर्ण वैचारिक, सामाजिक आणि सांस्कशतिक विचार विश्व ढवळून टाकले. या नव्या चळवळींनी महाराष्ट्रातील तरूणांना जसे लिहिते बोलते केले तसे देशातील अन्य भाषेतील सांस्कृतिक क्षेत्रातील धुरीनांचेही लक्ष वेधून घेतले. कोणतीही साहित्य संस्कृती ही देशी तत्वावर उभी नसेल तर मौलिक ठरू शकत नाही. देशीयता हाच लेखकाच्या प्रेरणेचा आणि निर्मितीचा कणा असतो. असे मत भालचंद्र नेमाडे यांनी व्यक्त केले. त्यादृष्टीने साहित्यकृतीकडे पाहून तिचे मूल्यमापन केले पाहिजे असा त्यांनी विचार मांडला

१९९० नंतर अर्थिक उदारीकरणाचे धोरण आपण स्वीकारले त्यामुळे सर्वच क्षेत्राचे झालेले खाजगीकरण, संगणक व उपग्रह संदेशवहन यामुळे जागतिकीकरणाच्या लाटेवर सर्व जग स्वार झाले. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या ग्राहकांपर्यत पोहोचवण्याची गरज उरली नाही. टी.व्ही. आणि मोबाईलच्या माध्यमातून महानगरापासून तर आदिवासी पाड्यापर्यंतचे लोक त्यांच्यापर्यंत धावून आले. या जागतिकीकरणाच्या संदर्भात देशीवादाची भूमिका काय? असा प्रश्न विचारला जाऊ लागलादेशी असणे म्हणजे त्या त्या भूमीशी जोडलेले असणे होय. हे नाते तिथली भाषा, संस्कृती आणि मुल्ये यांच्याशी असते. हे नाते अबाधित ठेवणारी स्वाभाविक अवस्था म्हणजें देशीपणा. देशी नसलेल्या परक्या बाहेरून येणारी मूल्ये, भाषा व संस्कशती यांचे जेंव्हा देशी भाषा, संस्कृती व मुल्यावर आक्रमण होते तेंव्हा स्वत:च्या अस्तित्वासाठी मानवी समूहांना देशीवादी व्हावे लागते.

'देशीवाद' ही संकल्पना मराठीत प्रथमत: भालचंद्र नेमाडे यांनी १९८० मध्ये मांडली. इंग्रजीत ती Nativisim म्हणून राल्फ लिंटन यांनी १९४३ मांडली. मराठीत जरी १९८० नंतर देशीवादाची चर्चा घडून आली असली, तरी तिच्यावर अनेक आक्षेप नोंदवण्यात आले आहेत. काही मराठी समीक्षकांनी या विचाराला परंपरागत म्हणून विरोध केला आहे. देशीवादी विचारांविषयी अनेक गैरसमज पसरविले आहेत. मराठी समीक्षेच्या प्रातांत नेहमीच आयातीला प्राधान्य मिळाल्याचे दिसून येते. त्यामुळे आमच्या मातीतल्या साहित्याचे मूल्यमापन करताना आजही आम्ही परकीय किंवा बाहेरून आलेल्या समीक्षा मूल्यांचा वापर करीत आहोत. देशीवाद ही मराठीतील आमच्या भूमीतील एक प्रभावी नवसमीक्षा असून तिच्यात मानवी जीवनमूल्ये केंद्रवर्ती ठरली आहेत.

प्रत्येक भूमीत एक विशिष्ट संस्कृती नांदत असते. तिच्या आशा आकांक्षा, जाणिवा, नेणीवा, परंपरा, विचार, आचार नेहमीच वेगळे असतात. अशा वेगळ्या भूमीतून निर्माण होणारे साहित्य हे प्रादेशिकही ठरू शकते. परंतु प्रादेशिकतेला भूमीच्या मर्यादा येतात. तशा मर्यादा देशीवादात नसाव्यात. असे नेमाडे यांनी सांगितले आहे. तरीही देशीवादाकडे संकुचित नजरेने पाहिले जाते. आल्याकडे नेहमी 'दुसऱ्याचे ते चांगले' असे म्हणण्याची वृत्ती आहे. म्हणजेच आपल्याला



Scanned with OKEN Scanner

नेहमीच परकीयांचे आकर्षण राहिले असून त्या आकर्षणापोटी आम्ही आमच्या कितीतरी चांगल्या गोष्टी मोडीत काढल्या आहेत. इथल्या माणसाला दोन वेळचे अन्न नाही मिळाले तरी चालेल, परंतु देशात शेती मोडीत निघून समृद्धी आली पाहिजे. अशी आपली मानसिकता ही परकीयांच्या आकर्षणातूनच झाली आहे. चुलीवरचा स्वंयपाक करताना धुर लागतो, म्हणून आम्ही चुली बंद केल्या. आणि आज चुलीवरच्या जेवणासाठी ढाब्यांचा शोध घेत फिरतो आहोत. ही आपली अवस्था परकीयांच्या अनुकरणातूनच झाली आहे. अशा एक नव्हे तर अनेक गोष्टी आपणाला सांगता येतील. त्या गोष्टींचा आपल्या संस्कृतीशी संबंध आहे. संस्कृतीतून समाजाचे दर्शन घडते. तर समाजातून साहित्य निर्माण होत असते. यापलिकडे असे म्हणता येते की, प्रत्येक संस्कृतीचे, समाजाचे वेगळेपण जपण्याचे काम साहित्य करीत असते. त्या साहित्याचे म्यूल्यमापन करीत असताना ते साहित्य ज्या मातीतून जन्माला आले, ज्या संस्कृतीत वाढले, ज्या समाजातून प्रमाणके निर्माण झाली, जी भाषाशैली वापरण्यात आली, त्यात कोणकोणत्या जीवनमूल्यांचे दर्शन होते तसेच लेखकाने आपली बांधिलकी कशी जपली आहे. यांसारख्या मूल्यतत्त्वांच्या आधारे साहित्याचे मूल्यमापन व्हायला हवे. ते योग्य ठरणारे असेल. मात्र आधुनिकतेच्या नावाखाली आणि परकीयांच्या आकर्षणापोटी असेल कदाचित आम्ही आमच्या मातीतल्या साहित्याचे मूल्यमापन पाश्चात्य विचारांच्या मूल्यतत्त्वांच्याआधारे करतो आहोत तसे न करता आमची देशी तत्त्वे विचारात घेऊन केलेले साहित्याचे मूल्यमापन हे खऱ्या अर्थाने योग्य मूल्यमापन होईल. तसेच आमचे साहित्यशास्त्र निर्माण करता येईल, हा नेमाडे यांचा विचार देशीवादाच्या चर्चेत महत्त्वाचा आहे.

'देशीवाद' या संकल्पनेचा राल्फ लिंटन यांनी केलेला विस्तार, अभ्यासताना वाङ्मयीन संज्ञा—संकल्पना कोशामधील देशीवादावरील संक्षिप्त परंतु स्पष्ट अशा नोंदीचा आधार घेतलेला आहे. राल्फ लिंटन यांनी मांडलेल्या 'देशीवाद' या संकल्पनेचा गाभा:

१. देशीवादी चळवळ म्हणजे एखादया समाजातील सदस्यांनी त्यांच्या संस्कृतीच्या निवडक पैलूंचे पुनरूज्जीवन करण्याचा व त्यांना चिरस्थायित्व देण्याचा जाणीवपूर्वक व संघटितपणे केलेला प्रयत्न.

२. जेव्हा एखाद्या समाजाला आपल्यापेक्षा वेगळया अशा संस्कृती अस्तित्वात आहेत व त्यांच्या अस्तित्वामुळे आपल्या स्वतःच्या संस्कृतीला धोका पोहोचू शकतो याची जाणीव होते तेव्हाच त्या समाजात आपल्या संस्कृतीला चिरस्थायित्व देण्याचे जाणीवपूर्वक व संघटित असे प्रयत्न सुरू होतात.

३. देशीवादी चळवळींचा घोषित उद्देश भूतकालीन संस्कृतीचे पुनरूज्जीवन करणे वा वर्तमानकालीन संस्कृतीला चिरस्थायित्व देणे हा असतो.

४. देशीवादी ही संज्ञा ज्या विविध घटितांना उद्देशून वापरली जाते त्या सर्वांमध्ये सांस्कृतिक घटकांची निवड आणि अशा घटकांना चिरस्थायित्व देण्याचा हेतुपरस्पर जाणीवपूर्वक प्रयत्न हे एक समान सूत्र असते.

प्रत्येक देशात ही देशीवादाची संकल्पना आपापल्यापरीने वापरली गेली. मराठी साहित्यात या देशीवादाबद्दल डॉ. गणेश देवी सांगतात की, 'देशीवादाच्या दृष्टीतून पाहिल्यास मराठी साहित्य हे मराठी भाषिक समाजाने निर्माण केलेल्या कृतींचे असून त्यात मराठी भाषा संस्कृती मध्यवर्ती असावी हे भान आवश्यक बनते. लेखक ज्या समाजासाठी तो लिहितो त्यांचा एक नैतिक बांधिलकीचा संबंध असणे देशीवादाला



Scanned with OKEN Scanner

जरुरी वाटते.'' कोणतेही परिवर्तन होण्यासाठी विशिष्ट परिस्थिती निर्माण व्हावी लागते.

मराठीत देशीवाद येण्याला अनेक कारणे महत्त्वाची ठरली. त्यातील सर्वात प्रमुख कारण म्हणजे पाश्चात्य साहित्याचा मराठी साहित्यात झालेला अवास्तव संचार. १९ व्या शतकापासून या पाश्चात्य साहित्याने, विचाराने मराठी साहित्य झाकोळले गेले. मूळ मराठी साहित्यातील संस्कृती, विचार, मूल्य नाहीसे झाले असल्याची जाणीव झाली. भौतिक विचारांच्या प्रवाहात यंत्रयुगात मूळ साहित्याच्या ध्येयाकडे पाठ फिरवली जात आहे असे भालचंद्र नेमाडे यांना प्रकर्षाने जाणवले आणि यातूनच देशीवाद मराठी साहित्यात अवतरला. यासंदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण प्रतिपादन डॉ. वासुदेव सावंत यांनी केले आहे. ते असे की, ''१९६० नंतरच्या साहित्यातील सांस्कृतिक परिवर्तनाचे समग्र आकलन आणि विश्लेषण करु शकेल अशा प्रकारचे एक परिपूर्ण पर्यायी सौंदर्यशास्त्र या काळात निर्माण झालेले आहे काय? या प्रश्नाचे होकारार्थी उत्तर देणे कठीण आहे. परंतु साठनंतरच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जाणिवांचे व्यवस्थापन सैद्धांतिक पातळीवर करण्याचा एकमहत्त्वाचा प्रयत्न देशीवादाच्या रुपाने झालेला आहे.''

देशीवाद हा आपणाला आपल्या प्राचीन साहित्याकडे नेतो. इंग्रजांच्या प्रभावाने पाश्चात्य विचार, संस्कृती १८ व्या शतकानंतर आपणाकडे आली आणि तिचा प्रभाव वाढत—वाढत ती आपल्या जगण्याचा अपरिहार्य घटक बनली. मूळची महाराष्ट्रीय मानवतावादी संस्कृती कालबाह्य म्हणून आपण त्याकडे पाठ फिरवली. संतसाहित्य, प्राचीन साहित्य त्यातील मानवी मूल्य,संस्कृती, आध्यात्मिक उन्नती याकडे पाठ फिरवून नव्या युगातील उपभोगाची संस्कृती, वासनामय मूल्ये, अनैतिकता, यंत्रयुग, भौतिक जीवन याला महत्त्व देऊन त्याचा अतिरेक केला. या साऱ्याला साहित्यातून बाजूला सारुन साहित्याला मानवतावाद, समाजवाद, जीवनाचा मूळ उद्देश, समाधान, सहिष्णूता इ. सारे यावे. साहित्यातून जीवनाचा प्रवास कोऽहम पासून सुरु होऊन सोऽहम पर्यंत पोहचवावा हा मूळ मराठी साहित्याचा उद्देश भालचंद्र नेमाडे यांनी देशीवाद मांडून नव्याने पुनरुज्जीवीत केला. साहित्यातील त्यांची ही कामगिरी अत्यंत मूलगामी आहे. यासंदर्भात डॉ. वासुदेव सावंत म्हणतात की, ''आपल्या संस्कृतीने दिलेल्या विश्वविशयक दृष्टिकोणाचा आणि आपल्या मूल्यविवेकाचाच आपणाला विसर पडलेला आहे. एवढेच नव्हे तर आपल्या सांस्कृतिक वारशाकडे तुच्छतेने पाहण्याची प्रवृत्तीही निर्माण झालेली आहे. आपल्या सांस्कृतिक वारशाचे महत्त्व ओळखणे आणि स्वत:कडेच हीनत्वाने पाहण्याचा न्यूनगंडावर मात करणे यासाठीच देशीवादाची आवश्यकता आहे.''

आपली साहित्य संस्कृती ज्ञानेवश्वरांपासून तुकारामांपर्यंत सुमारे चारशे वर्षे सतत चाललेल्या जागरामुळेच सारे विरोधी प्रभाव पचवत आपली मराठी भाषा संस्कृती टिकली. अरबी, फारसी, तुर्की अशा अनेक परकीय भाषांचे प्रभावपचवत त्यातील कित्येक शब्दांना पोटात घेत मराठी भाषा आणखीनच समृद्ध होत गेली. आपल्या संतांनी दिलेला वारसा परकीय संस्कृतीच्या आक्रमणांना न जुमानता ताठ मानेने आपले सत्व जपण्याचा व टिकवण्याचा प्रयत्न मराठीने केलेला दिसतो. मराठीत बोलणं, चालणं, लिहणं आणि मराठी असणं ही एक चांगल्या भाग्याची गोष्ट आहे. अशी सुसंस्कृत वाङ्मयीन संस्कृती जगातल्या फार थोड्या भाषांमध्ये आहे. इंग्रजी, जर्मन, फ्रेंच, रशियन यांच्या इतकी आपली वाङ्मयीन संस्कृती जागरुक नसली



Scanned with OKEN Scanner

तरीही संतपरंपरा, महानुभाव परंपरा असल्याकारणाने आपल्याकडे पहिल्यापासून सगळ्या क्षेत्रांतल्या लोकांनी साहित्यात योगदान दिलेले आहे. चोखामेळा, सावतामाळी, गोराकुंभार, नामदेव शिंपी, नरहरी सोनार यांच्यापासून ते आत्ताचे लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, दया पवार, नामदेव ढसाळ यांच्यापर्यंतच्या विविध सामाजिक गटांमधल्या लोकांचे योगदान मराठी साहित्यात दिसून येते. ही परंपरा क्वचितच जगातल्या इतर भाषांमध्ये दिसून येत असेल. आजच्या जागतिकीकरणात आपली भाषा, मूल्यव्यवस्था धोक्यात आली असताना या देशी वारशांची आठवण जागवणे म्हणूनच महत्वाचे आहे. आपल्या सारखी परंपरा इंग्लंडमध्येही दिसून येत नाही. तेथे अजूनही उच्च वर्ग, मध्यम वर्ग, यांचीच साहित्यिक अभिव्यक्ती असलेली दिसते. तेथेही कामगारांच्या हक्कांच्या गोष्टी मांडल्या जातात. परंतु त्या शोषित वर्गाला यातून बोहर काढण्याचा प्रयत्न कोणीही केला नाही. सकाळी अंधारातकामावर जायचे व सकाळी अंधारातच कामावरुन यायचं असे जीवन तेथील कामगार वर्षानुवर्ष जगत आला आहे. जशी अनेक उदाहरणे परकीय भूमीवर दिसतात तशीच आपल्या भारतातही दिसतात. नारायण सुर्वे यांनीही अशाच कामगाराचे विश्व आपल्या कवितेतून अधोरेखित केलेले आहे. नारायण सुर्वेचा अपवाद वगळला तर ज्या प्रमाणात परिघावरचं लेखन केंद्रस्थानी यायला हवं होत ते तितक्या प्रमाणात मराठीत आले नाही.

संस्कृती, समाज, परंपरा या प्रवाही असायला पाहिजेत साधारण त्या कित्येकदा तशा असतातही. जसं आंधळेपणाने अंगिकारलेलं जागतिकीकरण समाजाला घातक ठरत. त्याचप्रमाणं अतिरेकी स्थानिकवाद, क्षेत्रीयवाद, देशीवाद किंवा मूलतत्ववाद देखील समाजाला घातक ठरतो. वाद कोणत्याही स्वरुपाचा असो तो समाजातील एखाद्या विद्वानाने मांडलेला आहे म्हणून डोळे झाकून स्वीकारणे हे समाज विघातक ठरते. पण याचा अर्थ असाही नाही की नेमाडे यांच्या देशीवादात काही तथ्यच नाही. आज जागतिकीकरण इतके जवळचे वाटू लागले आहे की, त्याचे गोडवे गायले जातात. परंतु अशा विचारप्रणालीचा, त्याच्या होणाऱ्या संभाव्य फायद्याचा भडिमार होत असताना, जागतिकीकरणाची दुसरी बाजू मांडण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाडे यांनी केलेला दिसतो. परंतु भारतीय समाजाचे एकूणच चित्र लक्षात घेता भारतात धर्मवादी संकल्पनांना हव तसं वाकवून त्याला धार्मिक रंग देऊन, अतिरेकी विघातक कार्य वाढवणे, विघातक प्रवश्त्तीकडून गैरवापर केला जावू शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे 'धार्मिक अंधश्रध्दा आणि मूलतत्वावादाला आयुष्यभर विरोध करणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉम्रेड गोविंद पानसरे व डॉ. एम.एस. कलबुर्गी या विद्वानांची अलिकडेच हत्या झाली. म्हणजे जेवढा जागतिकीकरणाचा प्रभाव वाढीस लागेल तेवढाच देशीवाद झपाट्याने वाढतच जाईल यात शंकाच नाही. मराठी साहित्य संस्कश्तीमध्ये साधारण ८० च्या दशकादरम्यान देशीवादाचे महत्व जाणवू लागले. खर तर यापूर्वीच्या साहित्यामध्ये ज्या परंपरा, समाज, चालिरिती होत्या, त्या देशीच होत्या पण जागतिकीकरणाच्या जाणिवेतूनच देशीवाद तयार होऊ लागला. आपल्या जुन्या परंपरा वा गोष्टी सुंदर आहेत. म्हणजेच 'जुने ते सोनं' या भावनेने त्या टिकल्या पाहिजेत असाच एक भावनिक सूर देशीवादात दिसून येतो. उदा. खेडेगावात आढळणारी ग्रामसंस्कृती ती सुंदर स्वरुपाची होतीच परंतु त्यात सुधारणा होणे गरजेचे होते. जागतिकीकरणामुळे भारतीय संस्कश्ती अधिक प्रखर दिसते. जगाचा आणि खेड्याचा पूर्वी संबंध नव्हता. परंतु विज्ञानाच्या युगात हे शक्य झाले. अनेक सुविधा



Scanned with OKEN Scanner

खेड्यापर्यंत आल्या परंतु गावगाड्यावर प्रेम करणाऱ्या समाजाने देशीवादी भूमिका स्वीकारल्या म्हणजे आपले सत्व जपण्याचा प्रयत्न झाला.

इतिहासात पाहिले तर भारत नेहमीच परकीय वसाहतीच्या प्रभावाखाली शेकडो वर्षे राहिला आहे. भारतीय संस्कृती जगाच्या पाठीवर धर्मनिरपेक्ष अशीच आहे. आजही या देशात अनेक जाती, धर्मांचे, संस्कृतीचे, भाषेचे अनुकरण करणारे लोक गुण्या गोविंदाने राहतात. परंतु काही प्रमाणात भाषा व संस्कृतीच्या संदर्भात बरेच गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतात. पाश्चिमात्य संस्कृतीत, 'राष्ट्र' महत्वाचे असते. आपल्याकडे 'देश' महत्वाचा असतो. 'देश' म्हणजेच विशिष्ट संस्कृती असलेला प्रदेश, राष्ट्र म्हणजे एकच भाषा, एकच प्रमुख धर्म व एकच मूल्यव्यवस्था असावी अशी अपेक्षा असते. देशीवाद म्हणजे लहान लहान समूहांची भौगोलिक व सांस्कृतिक स्वायत जोपासणे मग तेथील कला आणि साहित्याच्या समीक्षेच्या प्रमाणकांचीही मागणी देश्य तत्वानुसार झाली पाहिजे असा आग्रह धरते. जागतिकीकरणातील नव्या तंत्रज्ञानामुळे राष्ट्रवादाच्या अतिरेकाला आणि धार्मिक उन्माद व मूलतत्ववादाला अधिक अनुकुल परिस्थिती मिळाली आहे. हे अलिकडच्या काही घटनांवरुन आपण अनुभवतच आहोत. देशीवाद हे नेहमीच अतिरेकी राष्ट्रवादाला विरोध करताना दिसतो. तसाच तो धार्मिक व सांस्कृतिक मूलतत्ववादाला विरोध करतो हे लक्षात आल्यामुळे देशीवाद आणिजागतिकीकरण अलिकडच्या काळात अधिकच औचित्यपूर्ण झाले आहे. देशीवाद म्हणजे भौगोलिक परिसर निश्चित करुन भूसांस्कृतिक विचार करणे होय. देशीवाद आणि देशीपण यातला फरक समजून घ्यायला पाहिजे. कोणतीही परंपरा समजून घेऊन ती जाणिवेत उतरणं म्हणजे देशीवाद, केवळ आपलं आहे म्हणून तसंच केलं पाहिजे असा आग्रहच करत राहिल तर त्यात यश येणार नाही. जागतिकीकरणजेवढं वाढत जाणार तेवढाच प्रखर देशीवाद वाढणार हे निश्चित आहे. एका अर्थाने विचार केला तर पूर्वग्रह न ठेवता भूमिका घ्यायची तर जागतिकीकरण आणि देशीवाद हे एकमेकांना पूरक स्वरुपाचे आहेत असेच म्हणता येईल. म्हणजे आपण जागतिकीकरणाला विरोध करायचा नाही, तर त्याचा ओंजळ खुली करुन स्वीकार करायचा आणि आपले जे सुंदर आहे हे टिकवण्याचा प्रयत्न करायचा म्हणून देशीवाद महत्वाचा असेच शेवटी म्हणावे लागेल.

**संदर्भग्रंथ:**

१ नेमाडे भालचंद्र, 'टीकास्वयंवर' साकेत प्रकाशन

२ भोसलेद.ता., 'ग्रामीण साहित्य एकचिंतन' —मनोविकास प्रकाशन

३ जाधव मनोहर,समीक्षेतील नव्या संकल्पना —स्वरूप प्रकाशन

४ मनोहर यशवंत,'साहित्य संस्कृतीच्या प्रकाशवाटा'

५ बाबर अशोक, 'देशीवाद',साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती

६ सानप किशोर, 'भालचद्रं नेमाडे याची समीक्षा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती २००५

□□□



Scanned with OKEN Scanner